बीड (महाराष्ट्र) । सायं.दैनिक । मराठी । वर्ष – ०३ । अंक – १ । वार शनिवार दि २७ सप्टेंबर एमएचएमएआर /२०२३/८३९६५ । किंमत ३ रू. । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening Marathi n Year - 03 Issue - 1 SATURDAY 25 September 2025 RNI : MAHMAR/2023/83965 Price - 3 Rupees Pages 4

# बीड जिल्ह्यात मुसळधार पावसाचा तांडव: प्रशासनाकडून रेड अलर्ट जारी..




सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
● संपादक :– दिपक थोरात मो.९८६०८९८५६४



# बीड जिल्हा पाण्यात, शेतकरी संकटात! आठ हजारांची भीक' नको, ओला दुष्काळ जाहीर करा; लाखो रुपयांच्या नुकसानीवर शासनाची क्रूर चेष्टा?

- ओला दुष्काळ म्हणजे चेष्टा नाही, हेक्टरी ८ हजार फेकून शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळू नका? शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू न्यायाची किंमत विचारत आहेत
- कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांचा जीव स्वस्त, अतिवृष्टीमुळे पुरात वाहून गेलेल्या शेतकऱ्यांच्या मृत्यूची किंमत फक्त ४ लाख आणि विमान अपघातातील मृतांची किंमत १ कोटी?







बीड (प्रतिनिधी):– जिल्ह्यात मुसळधार पावसाचा कहर सुरूच असून, प्रशासनाने रेड अलर्ट जारी केला आहे. मध्यरात्रीपासून सुरू असलेला जोरदार पाऊस आज दिवसभर सुरू राहिला. ढगांच्या गडगडाटासह सुरू असलेल्या या पावसामुळे नद्या–नाले तुडुंब भरून वाहत आहेत. नदीकाठच्या गावांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या असून, अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. बिंदुसरा नदी उफाळून वाहत आहे, तर मांजरा, माजलगाव आणि सिंदफणा प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. संपूर्ण जिल्ह्यात जनजीवन विस्कळीत झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. शेतातील पिके खरडून वाहून गेली, घरे उद्ध्वस्त झाली, संसार उघड्यावर आला. जमीन धुपून शेवाळाच्या थराखाली गाडली गेली आहे. लाखो रुपयांचे नुकसान सहन करावा लागणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूंचा महापूर आणि मनात असहायतेचा आक्रोश आहे.

शेतकऱ्यांची मागणी आहे की ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट मदत द्यावी. मात्र, शासनाकडून केवळ हेक्टरी आठ हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या मते ही रक्कम चेष्टा करण्यासारखी असून लाखो रुपयांच्या नुकसानाच्या तुलनेत तोंड पुसण्यापुरतीही नाही. सरकारच्या मदत धोरणातील अन्यायकारक तफावतही ठळकपणे समोर येत आहे. विमान अपघातात मृतांच्या कुटुंबियांना ५० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतची भरपाई दिली जाते, तर अतिवृष्टी व पुरामुळे उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या मृत वारसांना फक्त ४ लाख रुपये. ज्या कुटुंबांच्या घरात पाणी शिरले आहे त्यांना केवळ ५ हजार रुपये आणि १० किलो धान्य. हा फरक जनतेच्या जिवनाचा आणि शेतकऱ्यांच्या आक्रोशाचा थेट अपमान मानला जात आहे. या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. पिके वाहून गेली असून, घरे उद्ध्वस्त झाली आहेत. शेतकऱ्यांनी ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट मदत देण्याची मागणी केली आहे. शासनाने हेक्टरी केवळ आठ हजार रुपयांची मदत जाहीर केल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. या मदतीला ते 'चेष्टा' मानत आहेत. अतिवृष्टीमुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या वारसांना केवळ ४ लाख रुपये, तर विमान अपघातात मृतांना ५० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत भरपाई मिळते, या तफावतीवर शेतकऱ्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. ही मदत म्हणजे 'तोंड पुसण्यापुरतीही नाही' अशी भावना व्यक्त करत, तातडीने न्याय्य मदत न मिळाल्यास रस्त्यावर उतरण्याचा इशारा बळीराजाने दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मदत वाटपाचे काम सुरू असले तरी, मदत अपुरी असल्याने जिल्ह्यात तीव्र असंतोष पसरला आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणं थांबवून तात्काळ सरसकट व न्याय्य मदत द्यावी, अन्यथा संतप्त बळीराजा रस्त्यावर उतरेल यात शंका नाही.

## पूरग्रस्तांना मदतीचा हात; लेंडी रोड, मोमीनपुरा भागात आ. संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते अन्न–धान्याचे वाटप



जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पूरग्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने मदतकार्याला सुरुवात झाली आहे. बीड शहरातील लेंडी रोड आणि मोमीनपुरा परिसरातील ज्या नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते, अशा पूरग्रस्त कुटुंबांना आज अन्न–धान्याचे वाटप करण्यात आले. बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते हे मदत साहित्य गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचवण्यात आले. या संकटाच्या काळात ही मदत छोटासा प्रयत्न असली तरी, नागरिकांसाठी तो मोठा आधार ठरला आहे. प्रशासनाने पूरग्रस्तांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तातडीने हे पाऊल उचलले आहे. यावेळी बोलताना, आमदार क्षीरसागर यांनी प्रशासनाच्या वतीने नागरिकांना धीर दिला आणि पुढील मदतीसाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे आश्वासन दिले.

## बीड शहरात अतिवृष्टीचा कहर सारिका क्षीरसागरांची तातडीची पाहणी



बीड शहरात गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागात पाणी साचले असून घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्ते, गल्लीबोळ आणि निवासी भाग जलमय झाल्याने लोकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन सारिका क्षीरसागर यांनी तातडीने त्या भागाची पाहणी केली. पाणीघरात शिरल्याने संतप्त व चिंताग्रस्त नागरिकांशी संवाद साधत त्यांनी परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी त्वरित प्रशासनाशी संपर्क साधून योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. सारिका क्षीरसागर यांच्या हस्तक्षेपानंतर प्रशासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली असून जलनिस्सारणाची कामे गतीने सुरू करण्यात आली आहेत. नागरिकांना मदत व आवश्यक सुविधा पुरविण्याबाबतही संबंधित विभागांना आदेश दिले आहेत. दरम्यान, बीडकरांना सतत सुरू असलेल्या पावसामुळे अजूनही चिंता आहे. पुढील काही तास पाऊस सुरू राहण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

● तळवट बोरगाव येथील महिला अत्याचार, व ट्रॉसिटी गुन्ह्याच्या आरोपीस अटकपूर्व जामीन बीड न्यायालयाने फेटाळला

# आरोपी गाडे यास जामीन अर्ज फेटाळला नंतर दुसऱ्या दिवशी अटक डी वाय.एस.पी. कटके यांनी चार्ज घेताच धडाकेबाज कारवाई







तलवाडा (प्रतिनिधी):– गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत तळवट बोरगाव येथील एका दलीत समाजातील महिला वर गावातील एका आरोपीने बळजबरी करत घरात घुसुन जातीवाचक शिवीगाळ करत तु मला आवडतेस असे म्हणत छेडछाड केली होती अशी तक्रार तलवाडा पोलीस स्टेशन येथे महिलेने दिनांक ३ सप्टबर रोजी दिली होती मात्र आरोपीने अटक पूर्व जामीन मिळण्यासाठी बीड न्यायालय त जामीन अर्ज दाखल केला होता काल न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला असुन आरोपीस अटक करण्यात आली असल्याचे स्वतः डी वाय एस पी अनिल कटके यांनी दैनिक आरंभ चे तलवाडा पत्रकार सुमेध करडे यांनी संपर्क केला असता त्यांनी सांगितले आहे त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असेल त्यांनी चार्ज घेताच त्यांची ही पहिली कारवाई आहे

या बाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत तळवट बोरगाव येथील दलित महिले वर गावातील आरोपी सोमनाथ दिलीप गाडे या आरोपीने तिच्या वर नजर ठेवून तीन तारखेला दुपारी दोन वाजता सदरील महिला घरी एकटी होती आरोपी त्या ठिकाणी येऊन माझ्या कडे शेतात कामाला का येत नाहीस, तु मला आवडतेस, असे म्हणत तिच्या सोबत छेडछाड करू लागला व पान २ वर...

CMYK

## संपादकीय...

### मायबाप सरकार, फक्त कागदावर नको, बांधांवर या! निकष बाजूला सारून मदतीचा हात पुढे केला पाहिजे

मराठवाड्यावर निसर्गाचा कोप झाला आहे की, पाऊस रझाकार झाला आहे, हा प्रश्न भेडसावतोय. कायम पाण्यासाठी आसुसलेला हा भूप्रदेश आज अक्षरशः पाण्यात बुडालेला आहे. वयोवृद्ध सांगतात, पावसाचं इतकं भयावह 'निजामी' रूप कधीच पाहिलं नव्हतं. मुसळधार पावसाने शेतं चिखलात गाडली, माती खरवडून नेली, हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. अनेकांचे संसार उघड्यावर पडले; डोळ्यांतलं पाणीही पावसात मिसळलं.

या पावसाने तब्बल ३६०० गावे झोडपली, १२९ मंडलांत अतिवृष्टी केली, तर ७ लाख हेक्टरवरील पिके पूर्णपणे नष्ट झाली. लाखो शेतकरी उद्ध्वस्त झाले. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि नैर्ऋत्य मान्सूनची दिशा अचानक बदलली. ढगांचा डोंगर जमा झाला आणि मराठवाड्यावर आभाळच कोसळलं! जयकवाडीसह सर्व धरणं काठोकाठ भरून वाहू लागली. यंदा तहान भागवायला नाशिक-अहिल्यानगरचं पाणी मागण्याची वेळच आली नाही; उलट जयकवाडीतून जलक्षमतेच्या दुप्पट पाणी नदीत सोडावं लागलं. ५०० अब्ज घनफूट पाणी वाहून गेलं. माजलगाव, मांजरा, तावरजा, सिद्धेश्वर.. हीच अवस्था. लातूर, धाराशिव, बीड जिल्ह्यात तर पावसाने कहर केला. ७ लाख हेक्टरवरील मका, सोयाबीन, उडीद, मूग पाण्यात गाडले गेले. पैठण-पाचोड भागात मोसंबी, डाळिंबाच्या बागा बुडाल्या. उसाचे फड भुईसपाट झाले.

पावसाने केवळ शेतीच नाही तर जीवितहानीही केली. आजवर १८ जणांचे बळी गेले, गायी-म्हशी, बैल अशा पशुधनाची तर किती हानी झाली, याची गणनाच करता येणार नाही. शेकडो घरं, शाळा कोसळल्या. रस्ते, पूल वाहून गेले. हा विध्वंस पाहून १९९३ च्या भूकंपाच्या आठवणी जाग्या होतात. तो धरणीकंप होता, हे आभाळाचं रौद्ररूप आहे. मराठवाडी माणसांच्या नशिबी झोपायला धरणी आणि पांघरायला आकाश एवढंच; पण धरणी उसवली आणि आभाळच फाटलं तर शिवायचं तरी कसं?

पिकांचा चिखल आणि उघड्यावर पडलेला संसार पाहून धाय मोकलून हंबरडा फोडणाऱ्या माता-भगिनींना कोणत्या शब्दाने धीर देणार? पाण्यात बुडालेली शेती पाहून हताश झालेल्या शेतकऱ्यांच्या अंत:करणात किती कोलाहल असेल, याची कल्पना करता येणार नाही. सरकारने पंचनाम्याचे आदेश दिले आहेत. मंत्री पाहणी दौऱ्यासाठी मुंबईबाहेर पडले आहेत. अधिकारी सांगत आहेत की, 'ही नैसर्गिक आपत्ती आहे; निकषांनुसार मदत दिली जाईल', पण एवढ्या मोठ्या विध्वंसावर ही तुटपुंजी मदत म्हणजे शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार. मराठवाड्यातील नुकसानभरपाईपोटी राज्य सरकारने केंद्राकडे १४४९ कोटींची मदत मागितली, मिळाले फक्त ७२१ कोटी. हा आकड्यांचा खेळ आहे की, शेतकऱ्यांची थट्टा? पिकं गेली, संसार उघडा पडला; पण मदत म्हणजे थेंबभर पाणी!

आज गरज आहे तातडीच्या आणि थेट मदतीची. नुकसानभरपाईचे निकष शिथिल करून, लालफितीच्या विळख्यात न अडकवता शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित मदत पोहोचली पाहिजे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर 'लाडक्या बहिणींच्या' खात्यात कोट्यवधी रक्कम जमा करण्याची तत्परता दाखवली गेली, तेवढीच तत्परता शेतकऱ्यांना वाचवण्यासाठी दाखवायला काय हरकत आहे? आकडे, जीआर, पंचनामे अशा प्रकारच्या कसरतीत शेतकरी आणखी खचून जाईल. त्याऐवजी जर तुम्ही प्रत्यक्ष गावात जाऊन शेतकऱ्यांचे दु:ख डोळ्यांनी पाहिलंत, तर कदाचित तुमच्या डोळ्यांतही पाणी येईल. तोच दिलासा आज गरजेचा आहे. नुकसानभरपाईचे सगळे निकष बाजूला सारून सरकारने मदतीचा हात पुढे केला पाहिजे. मदत देताना जुना जीआर की नवा, हा सरकारी घोळ घालण्याचा हा प्रसंग नाही.

मराठवाड्यावर निसर्गाचा कोप झाला आहे की, पाऊस रझाकार झाला आहे, हा प्रश्न भेडसावतोय. कायम पाण्यासाठी आसुसलेला हा भूप्रदेश आज अक्षरशः पाण्यात बुडालेला आहे. वयोवृद्ध सांगतात, पावसाचं इतकं भयावह 'निजामी' रूप कधीच पाहिलं नव्हतं. मुसळधार पावसाने शेतं चिखलात गाडली, माती खरवडून नेली, हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. अनेकांचे संसार उघड्यावर पडले; डोळ्यांतलं पाणीही पावसात मिसळलं. या पावसाने तब्बल ३६०० गावे झोडपली, १२९ मंडलांत अतिवृष्टी केली, तर ७ लाख हेक्टरवरील पिके पूर्णपणे नष्ट झाली. लाखो शेतकरी उद्ध्वस्त झाले. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि नैर्ऋत्य मान्सूनची दिशा अचानक बदलली. ढगांचा डोंगर जमा झाला आणि मराठवाड्यावर आभाळच कोसळलं! जयकवाडीसह सर्व धरणं काठोकाठ भरून वाहू लागली. यंदा तहान भागवायला नाशिक-अहिल्यानगरचं पाणी मागण्याची वेळच आली नाही; उलट जयकवाडीतून जलक्षमतेच्या दुप्पट पाणी नदीत सोडावं लागलं. ५०० अब्ज घनफूट पाणी वाहून गेलं. माजलगाव, मांजरा, तावरजा, सिद्धेश्वर.. हीच अवस्था. लातूर, धाराशिव, बीड जिल्ह्यात तर पावसाने कहर केला. ७ लाख हेक्टरवरील मका, सोयाबीन, उडीद, मूग पाण्यात गाडले गेले. पैठण-पाचोड भागात मोसंबी, डाळिंबाच्या बागा बुडाल्या. उसाचे फड भुईसपाट झाले.पावसाने केवळ शेतीच नाही तर जीवितहानीही केली. आजवर १८ जणांचे बळी गेले, गायी-म्हशी, बैल अशा पशुधनाची तर किती हानी झाली,

# शेतकऱ्याच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावला नुकसान भरपाई साठी शेतकऱ्यांचा टाहो.!

*नुकसान भरपाईचं केवळ आश्वासन – मदती ऐवजी घोषणांचा पूर.!*
*घड्याळाच्या काट्यावर फक्त घोषणा,शेतकऱ्यांच्या नशिबात उध्वस्त दिवाळी.!*
*पंचनाम्यांत विलंब – शेतकऱ्यांच्या दु:खावर मीठ ; शेतकऱ्यांना मदत हवी ; जाहिरात नको ; अश्रूंचा पूर संसाराचा चिखल झाला.!*
*राजकारणातील निर्णय कोणत्याही क्षणी पण शेतकऱ्याला मदती साठी वेळ का .!*
*फडणवीस, शिंदे,पवार हे त्रेतीय युती सरकार फक्त नावालाच का.!*
*शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजाराची मदत घ्यावी.!*
*फडणवीस साहेब मागील आपली जाहिरात गाजली आता नुकसान भरपाईही तशीच होऊद्या.!*



संपूर्ण महाराष्ट्रात गेल्या काही आठवड्यांपासून अतिवृष्टी, ढगफुटी, वादळी , व कोसळत्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. लाखो हेक्टर क्षेत्रांवरील पिके पूर्णपणे उध्वस्त झाली असून, शेतकऱ्यांच्या कष्टाचं पीक अक्षरशः मातीमोल झालं आहे. अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले असून, पुढील हंगामासाठी बी-बियाणं खरेदी करण्याचीही ऐपत उरलेली नाही. या पार्श्वभूमीवर शासनाने तात्काळ हालचाल करुन पीक नुकसानीची पंचनामे पूर्ण करावीत आणि भरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी जोरदार मागणी सर्वत्र होत आहे.उद्ध्वस्त पीक, उध्वस्त भविष्य अनेक भागांत सोयाबीन, ऊस, कांदा, केळी, कपाशी या सारखी अनेक पिकं वादळी पावसाने आडवी झाली आहेत. जमिनीवर पाणी साचल्यामुळे मूळं कुजत असून, शिल्लक पीकही वाचण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. काही ठिकाणी बंधारे फुटून मोठ्या प्रमाणात मातीचे नुकसान झाले आहे.पिक काढणीला यायला दोन आठवडे उरले होते, पण ढगफुटीमुळे सगळं वाहून गेलं,असं सांगताना शेतकऱ्याचे डोळ्यात अश्रू उभे राहत आहेत . अशा परिस्थितीत केवळ सांत्वन पुरेसं नाही, तर शासनाकडून तात्काळ आर्थिक मदतीची गरज आहे.गेल्या अनेक वर्षांपासून असे दिसून येते की नैसर्गिक आपत्ती झाल्यानंतरही शासनाच्या यंत्रणा पंचनाम्यांसाठी उशीर करतात. कधी तर नुकसान झाल्यानंतर महिने उलटून गेले तरी शेतकऱ्यांना भरपाई मिळत नाही. यंदाही काही भागात तलाठी किंवा कृषी सहाय्यकांनी अद्याप शेतात पाहणी केली नाही, हे विदारक वास्तव आहे.आधारभूत मदतीची गरज शासन दरवर्षी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी विविध योजना, विमा योजना, अनुदान योजना राबवत असते, पण प्रत्यक्षात या योजनांचा लाभ वेळेवर मिळतोच असं नाही. त्यामुळे नुकसानीनंतर शेतकऱ्यांना आर्थिक हातभार लावण्यासाठी खालील उपाय तातडीने राबवणे आवश्यक आहे.तात्काळ सर्व भागांत सरसकट पंचनामे करणे, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना थेट खात्यावर भरपाई जमा करणे ,शून्य टक्के व्याजदराने तात्पुरते कर्ज उपलब्ध करून देणे,पुढील हंगामासाठी बियाणं, खते यावर १००% अनुदान देणे,विमा कंपन्यांनी दावे त्वरीत निकाली काढणे ,राजकीय आश्वासन पुरेसं नाही शेतकऱ्यांच्या घामाच्या मोबदल्याला आश्वासनांची झूल नको. फडणवीस, शिंदे आणि अजित पवार या त्रैतीय युती सरकारकडून केवळ भाषणं ऐकायला मिळत आहेत, पण जमिनीवर फारसा फरक दिसत नाही. नुकसानीची माहिती गोळा करणे, त्यावर तात्काळ निर्णय घेणे आणि एकही दिवस न घालवता भरपाई देणे ही सरकारची नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे.शेतकऱ्यांचा संयम संपतोय राज्यभरातील शेतकरी संघटना आता आक्रमक भूमिका घेऊ लागल्या आहेत. आमचं पीक गेलं, आता आम्ही रस्त्यावर येऊ! अशा घोषणा अनेक जिल्ह्यांतील मोर्चांमध्ये ऐकू येऊ लागल्या आहेत. शासनाने जर लवकरात लवकर ठोस पावलं उचलली नाहीत, तर याचे परिणाम सामाजिक अशांततेच्या स्वरूपात दिसून येतील.शेतकऱ्यांवर ओढवलेल्या नैसर्गिक संकटाने त्यांचे जगणेच संकटात आले आहे. अशा वेळी शासनाने तात्काळ हालचाल करून, पंचनामे, विमा दावे आणि आर्थिक मदत ह्या सर्व गोष्टी वेळेवर पूर्ण कराव्यात, हीच या समाजाच्या आधारस्तंभाकडून सरकारकडे अपेक्षा आहे. केवळ आश्वासने नव्हे, तर कृती हवी आहे – आणि तीही त्वरित.!

**पत्रकार दत्ता कराड**
९१५१५१०६५१

पान १ वरून..

**आरोपी गाडे यास जामीन अर्ज फेटाळला नंतर दुसऱ्या दिवशी अटक**

कुणाला सांगशील तर जीव मारून टाकील अशी धमकी देत तुम्ही मांगोटे खुप माजले आहात असे म्हणत महिला घरा बाहेर पडत आरडा ओरडा करत महिलेचा भाऊ व भावजयी आले व त्यांना घेऊन तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन तात्काळ तक्रार दाखल करून घेतली हे प्रकरण गेवराई येथील डी वाय एस पी नीरज राजगुरू यांच्या कडे तपास होता पण आरोपी सोमनाथ दिलीप गाडे हा फरार असुन त्या साठी काही तलवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते विनोद हातागळे, संतोष हातागळे, राम साबळे यांनी आरोपीस अटक करण्यात यावे म्हणुन उपोषण केले होते व तलवाडा कडकडीत बंद ठेवला होता मात्र नव्याने रुजु झालेले डीवायएसपी कटके यांनी आंदोलन करत्यास आठ दिवसात आरोपीस अटक करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते मात्र आठ दिवस होऊन गेले असता आरोपीस अटक करण्यात आली असुन त्याला कोर्टात हजर केले असून त्यास चउठ देण्यात आला असुन लवकरच त्यास जिल्हा कारागृहात पाठवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे सदरील प्रकरण हे जिल्हा भरत चांगलेच गाजले होते हे प्रकरण स्वतः बीड चे पोलीस अधिक्षक नवनीत कोवत याचे देखील लक्ष होते तर नव्याने रुजु झालेले डीवायएसपी अनिल कटके यांनी उपोषण करतेस दिलेला शब्द पाळला असून त्यांचे देखील समाज बांधवातून अभिनंदन होत आहे तर आरोपीस अटक करण्यासाठी तलवाडा पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर, पोलीस निरीक्षक एकशिंगे,पीएसआय स्वप्निल कोळी, डीवायएसपी पथक तील बोइनवाड फरार आरोपी अटक करण्या साठी महिना भर प्रयत्न केले मात्र त्यांना यश मिळाले असुन सर्व स्तरातील अभिनंदन होत आहे

## कालिकादेवी विद्यालय कबड्डी स्पर्धेत तालुक्यातून प्रथम

शिरूर कासार (प्रतिनिधी):- शिरूर (कासार) 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.यांच्या अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद गटशिक्षण कार्यालय, शिरूर (का.)ता.शिरूर (का.)जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमाने,भगवानबाबा विद्यालय बावी,ता. शिरूर (का.) येथे तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय कबड्डी स्पर्धा वयोगट १४ व १९ वर्षाखालील मुलींसाठी होती.या स्पर्धेमध्ये कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार मुलींच्या संघाने १४ व १९ वर्ष वयोगटातील दोन्ही संघाने 'प्रथम क्रमांक' पटकावला.या शालेय कबड्डी स्पर्धेत जिंकलेल्या स्पर्धकांची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या शालेय स्पर्धेत तालुक्यातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या मुलींच्या संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली आहे आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलींच्या कबड्डी स्पर्धेची तयारी अतिशय मेहनतीने करून घेतली होती.यामुळे



विद्यालयातील मुलींच्या संघाने तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून तालुक्यामध्ये कालिकादेवी विद्यालयाचे नाव लौकिक केले आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील कबड्डी स्पर्धेतील स्पर्धकांना जिल्हास्तरीय स्पर्धेत जाण्याचा मान मिळाला आहे.तेव्हा आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव मा.जयदत्त (अण्णा) क्षीरसागर, मा.रोहीत (दादा) क्षीरसागर, प्रशासन अधिकारी मा.डॉ.राजू मचाले,सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार, कार्यवाहक मा.एम.ए.राऊत,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, परिसरातील क्रीडाप्रेमी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

पान ४ वरून..

**परळी तालुक्यातील तेलसमुख,**

कौडगाव हुडा येथील नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याने मृत झाला होता, त्या तरुणाच्या कुटुंबीयांना आज प्रशासनाच्या वतीने ४ लाख रुपयांची आर्थिक मदत धनंजय मुंडे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आली. सदर रक्कम मयत शिवराज कदम यांच्या पत्नीच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. यावेळी युवक नेते अजय मुंडे, सूर्यभान मुंडे, राजाभाऊ पौळ, प्रभाकर पौळ, संजय जाधव, नितीन निर्मळ, भागवत कदम, बालासाहेब कदम, वसंत राठोड, भगवान पौळ, जानीमिया कुरेशी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या सह महसूल, कृषी, पोलीस आदी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

--------------------

**यश ढाकाची निर्घृण हत्या सखोल चौकशी आणि खऱ्या गुन्हेगारांना अटक करा**

घटना आहे. जर गुन्हेगारांना राजकीय पट बघ देण्याचा प्रयत्न राजकीय नेत्यांकडून करण्यात आला तर अठरापगड दलित समाजात रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही असा इशारा यावेळी आर्या प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा दिला आहे आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की – गुन्हेगारांना कठोर शिक्षा न झाल्यास आर्या सामाजिक प्रतिष्ठान शांत बसणार नाही. या दुःखद प्रसंगात समाज ठामपणे ढाका कुटुंबाच्या पाठीशी उभा आहे.यशच्या आठवणी समाजात नवी ज्वाला पेटवत राहतील..!

--------------------

**पूरामुळे संसार उद्ध्वस्त झालेल्या नागरिकांसाठी चंपावती काकी कडून ५१ हजार ची मदत**

देण्यासाठी शिरूर तालुक्याच्या ज्येष्ठ नेत्या चंपावती काकी पानसंबळ यांनी सिद्धेश्वर संस्थांचे महंत ह भ प विवेकानंद शास्त्री यांच्याकडे रोख स्वरूपात ५१ हजार रुपये सुपुत्र केले. शिरूर (कासार) शहर आणि शिरूर (कासार) तालुका अतिवृष्टीग्रस्त ग्रामीण भागांची पाहणी करून पूरग्रस्तांना फूल नाही तर फुलाची पाकळी मदत करण्यासाठी आज शिरूर (कासार) शहर आणि शिरूर (कासार) तालुक्यातील ग्रामीण भागांमध्ये नांदेवाली, ब्रम्हनाथ येळंब, माळेवाडी या अतिवृष्टीग्रस्त भागांचा पाहणी दौरा केला.

या दौऱ्यादरम्यान शेतीचे झालेले नुकसान, पिकांचे झालेले नुकसान, घरांची झालेली पडझड, घरे वाहून गेली, शेती वाहून गेली याची पूर्ण माहिती तेथील शेतकऱ्यांनी, महिला आणि नागरिकांनी दिली. अगदी लहान मुले सुद्धा या परिस्थितीत कोमेजून गेलेली दिसली. पूरग्रस्तांच्या व्यथा ऐकून घेताना अगदी मन हेलावून गेले. त्यांना धीर देत आम्ही या परिस्थितीत तुमच्या सोबत आहोत असा विश्वास दिला आणि त्याचबरोबर आवश्यक ती मदत सुध्दा केली.

--------------------

**बीड जिल्ह्यात पावसाचा कहर गेवराई शहरात पावसाने घर कोसळले**

पीक खरडून वाहून गेले आहे दररोज होणाऱ्या पावसामुळे लोकांची भयंकर नुकसान होत असल्याचे पाहायला मिळत आहे. सतत पडत असलेल्या पावसामुळे गरीब कुटुंबाचे घर कोसळुन मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याची घटना घडली असुन संसार उपयोगी वस्तु पुर्ण उध्वस्त झाल्या आहे गेवराई शहरातील बोर्डे गल्ली येथील निळकंठेश्वर मंदिर समोरील भुत्ते कुटुंबाचे रहाते घर दि.२६ शुक्रवार रोजी रात्री झालेल्या जोरदार पावसामुळे पुर्ण कोसळले असता संसार उपयोगी वस्तुंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे सुदैवाने या घटनेत जिवीत हानी झाली नाही घटनेचा पंचनामा करुन शासनाने मदत करावी अशी मागणी होत आहे सदर घटनेची प्रशासनाने कसली दखल घेतली नाही तलाठी,मंडळधिकारी,नगर परिषद,कर्मचारी यांनी अद्यापही घटनास्थाळाची पाहणी केली नाही शासन एकीकडे पूरग्रस्तांच्या पाठिशी ठाम असल्याचे सांगत आहे आणि पाहिजे ती मदत करु आश्वासन देत आहे मात्र शहरात घडलेल्या घटनेचे गांभीर्य प्रशासनाला नाही मग ग्रामीण भागात मदत मिळणे मुशकील आहे? प्रशासनाने घटनेचा पंचनामा करुन भुते कुटुंबाला नुकसान तात्काळ भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे .

--------------------

**रस्ते नाल्या नसल्याने गोरगरीब नागरिकांच्या घरात घाण पाणी**

पाईप लाईन करण्यात यावी. महेबुब नगर मध्ये नवीन डीपी व २० पोल टाकण्यात यावे. महेबुब नगर खाब्यावर लाईट व तात्काळ मुरूम टाकण्यात यावे. नसता लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालय समोर आमरण उपोषण दि.०६ /१ ०/ २०२५. करण्यात येईल अशी मागणी महाराष्ट्र मुस्लिम युवक प्रतिष्ठान याच्या वतीने मुख्याधिकारी यानां देण्यात आली

--------------------

**बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व**

लिफ्टच्या वर सेप्टी बॅरिकेट बसविलेले नाहीत. मोटरला एमरजंन्सी ब्रेक बसविलेले नाहीत. एमरजंन्सी ब्रेकचे काम लिफ्ट अडकल्याच्या नंतर त्याचा वापर केला जातो. लिफ्टला चक्कर प्लेट बसविलेली नाही. लिफ्टच्या चक्कर प्लेटचे काम सेप्टी नाही. लिफ्टला खड्यामध्ये जी सेप्टी असते ते बफर स्प्रिंग बसविलेली नाही. बीड जिल्ह्यातील देखभाल दुरूस्तीचे रेकॉर्ड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे उपलब्ध नाही. नवीन लिफ्टला परवानगी देण्याची जागेवर जाऊन वार्षिक तपासणी करण्याची जबाबदारी ऊर्जा विभागाच्या अंतर्गत असते. परंतु बीड मधील कोर्ट तसेच हॉस्पिटल जिल्ह्यातील सरकारी ऑफीस, कार्यालय, घरगुती बिल्डींग्स, अपार्टमेंट बीड मधील या सर्व जागेत

चुकीच्या पध्दतीने लिफ्टचे अर्धवट कामे करून लिफ्ट बसविण्यात आलेले आहेत व जिल्ह्यातील सर्व लिफ्ट धारकांना लिफ्टचे डुप्लीकेट परवाने काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी दिले आहेत.. यामध्ये लिफ्ट अचानक बंद पडली व काही दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण? दि.०३/०८/२०२५ रोजी शिवाजीराव हार्ड केअर अ‍ॅण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलमध्ये मराठा योध्दा मा. मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्यासोबत या हॉस्पिटलच्या लिफ्टमध्ये दुर्घटना घडली होती. त्यामध्ये जर लिफ्टचे पूर्णपणे काम व्यवस्थित केलेले असते तर अशा होणाऱ्या लिफ्टमध्ये होणाऱ्या दुर्घटना घडल्या नसत्या. शिवाजीराव हार्ड केअर अ‍ॅण्ड इमेजिंग सेंटर बीड या हॉस्पिटलचे लिफ्टचे लाईसन्स नसून सुध्दा लिफ्ट चालू आहे. या निष्काळजीपणाला कोणते अधिकारी व ठेकेदार जबाबदार कोण? बीड जिल्ह्यामध्ये ३०० ते ४०० लिफ्ट चुकीच्या पध्दतीने अर्धवट कामे करून बसविलेले आहेत व त्यामध्ये प्रत्येक लिफ्ट धारकाला कलर झेरॉक्स काढून डुप्लीकेट लाईसन्स दिले आहेत. यामध्ये हा सर्वकाही चुकीच्या पध्दतीचा पैशाचा लुटमारी कारभार या बीड जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकाऱ्यांसोबत मिळून केला आहे. बीड जिल्ह्यामध्ये सरकारी ऑफीस कार्यालय, सर्व हॉस्पिटल्स, घरगुती बिल्डींस व अपार्टमेंट या जागेत ज्या काही लिफ्ट बसविलेल्या आहेत. त्या प्रत्येक लिफ्टची पाहणी करून व त्या प्रत्येक लिफ्ट धारकाचे लायसन्स व्हेरीफाय करून ते ओरिजनल आहेत की डुप्लीकेट पाहण्यात यावेत व ज्या लिफ्टधारकाचे काम अपूर्ण व लायसन्स नाहीत त्या लिफ्ट तात्काळ बंद करण्यात याव्यात व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी व ठेकेदार यांच्यावर तात्काळ कार्यवाही करून या ठेकेदारांची लायसन्स रद्द करण्यात यावेत व यांच्या अर्धवट कामामुळे लिफ्ट मध्ये होणाऱ्या दुर्घटना टळतील ही मा. साहेबांना नम्र विनंती सदरील मागणी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे पाटील यांनी केले आहे

--------------------

**समाज कार्यात डीजेला बंदी आन**

आहे. तरी सर्व ऊा मालकांची मागणी आहे की सर्वोच्च न्यायालयाने सरकसट ऊा बंदी केलेली नाही, त्यांनी नियमावली दिली आहे परंतु प्रशासन कुठल्या ही प्रकारे वक्ष वाजाऊ देत नाहीत.

तरी सर्व वक्ष चालक म्हणत आहेत की आम्ही नियमात चालू तरी देखील कसल्या प्रकारे वक्ष वाजाऊ देत नाहीत परळी तहसील कार्यालयासमोर उपोषण करते तुम्ही घालून दिलेल्या नियमानुसार आम्ही त्याचे पूर्ण पालन करू असे यावेळी उपोषण करते अभिजीत किरवले. आदित्य जाधव .सुमेध कसबे. श्रावण वाघमारे. बबलू गलांडे. बाबा सावंत .सचिन बाळस्कर. विजय घोटाळे. बुद्ध रतन गोखले. संकेत दहिवडे. सुनील भांगे. गोविंद वाघमारे अनिल फड जयपाल क्षीरसागर. राहुल नागरगोजे. किशोर चाटे. मंगेश आघाव. अनिकेत वावळे .माणिक पोटभरे. अशोक सरवदे. इत्यादी या उपोषणामध्ये उपोषण करते उपस्थित आहेत.

--------------------

**उद्या बीड येथे होणाऱ्या ओबीसींच्या महाएल्गार मेळाव्याला मोठ्या**

भीतीमुळे ओबीसी समाजातील नागरिक आत्महत्या सारखे शेवटचे पाऊल उचलू लागले आहेत.यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण स्वतंत्र आणि अखंड ठेवण्यासाठी या महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यास ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्यासह ओबीसी समाजातील राज्यातील आणि राज्याबाहेरील नेते उपस्थित राहणार आहेत.या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महात्मा फुले समता परिषद आष्टी तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी केले आहे.

--------------------

**नगर रोड ते पालवन चौक धानोरा**

बाबी या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना सहन करावा लागत आहेत. याविषयी जिल्हाधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ नगर रोड ते पालवन चौक असणाऱ्या धानोरा रोडचे सिमेंट कॉंक्रिटीकरण व रुंदीकरणाचे काम मार्गी लावावे अन्यथा लोकशाही मार्गाने दिनांक १८/१२/२०२३ पासून परिसरातील नागरिकासह आमरण उपोषणाला बसणार आहोत असा इशारा कौशल्य मस्के यांनी निवेदनाद्वारे दिला होता कौशल्य मस्के यांच्या आंदोलनाला आज रोजी यश आले आहे यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी तीन कोटी रुपये धानोर रोड पालवन चौक या रस्त्यासाठी निधी मंजूर केला असून ते लवकरच काम पूर्ण होणार आहे कौशल्य मस्के यांनी या अगोदर सुद्धा अनेक निवेदन करावी व उपोषण करत या रस्त्याची मागणी केली होती त्यांच्या मागणीला यश आल्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कौशल्य मस्के यांनी व धानोरा रोड परिसरातील नागरिकाणी अजितदादा पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# पुढारी अन आधिकाऱ्यांचे फोटोसेशन संपलं; रस्त्याची दुरुस्ती मात्र अद्याप गायब

लिंबागणेश (प्रतिनिधी):- : बीड तालुक्यातील लिंबागणेश ते बोरखेड रस्ता गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पूर्णपणे खचून वाहतूक ठप्प झाली आहे. दुध-दुभते, भाजीपाला, शेतीमाल बाजारात नेणे, तसेच आजारी रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी ग्रामस्थांना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार संदिप क्षीरसागर, राजेंद्र मस्के यांच्यासह गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी व ग्रामविकास अधिकारी यांनी साइट व्हिजिट करून फोटोसेशन केले, मात्र १३ दिवस उलटून गेले तरी दुरुस्तीची कामे सुरूच झाली नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पालकमंत्री अजित पवार यांनी स्वतः वाहून गेलेले रस्ते व पूल तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना दिलेल्या असूनही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केले असल्याने जिल्हा प्रशासनाला याबाबत गांभीर्य नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली.



ख ग्रामस्थांचा रोष

मनोहर वाणी, सखाराम घोलप, अर्जुन घोलप, संतोष वाणी, विवेक बागल, विशाल घोलप, प्रकाश ढवळे, जनार्दन वाणी, रमेश घोलप, वैजनाथ वाणी, महावीर वाणी आदी ग्रामस्थांनी पुढारी आणि अधिकारी फक्त फोटो काढून जातात, पण रस्त्याची दुरुस्ती करत नाहीत अशी संतप्त प्रतिक्रिया नोंदवली.

ख रस्तारोकोनंतरही आश्वासन हवेत

५ दिवसांपूर्वी डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले होते. त्यावेळी आमदार संदिप क्षीरसागर, तहसीलदार चंद्रकांत शेळके, गटविकास अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी जायभाये, तलाठी गणपत पोतदार व ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी २ दिवसांत तात्पुरती दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत करू असे आश्वासन दिले होते. मात्र हे आश्वासन फक्त कागदावरच राहिले असून, आजपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही.

डॉ. गणेश ढवळे म्हणाले की, लिंबागणेश महसूल मंडळातील आपत्ती व्यवस्थापन केवळ नावापुरते आहे. प्रशासनाने गंभीरतेने पावले उचलली नाहीत, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

# शिवसेनेच्या वतीने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात



बीड (प्रतिनिधी):- सरकारने केलेले पंचनामे हे शेतकरी बांधवांना मान्य नाहीत अतिवृष्टी पूर परिस्थितीमध्ये ज्यांचे घर वाहून गेले आहेत त्यांना पहिले घर द्या शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे चाहुरवाडी येथील पुराणे घरासह उध्वस्त झालेल्या शेतकरी बांधवांना किराण कीट व ब्लँकेट सतरंजी वाटप केली आहे शिवसेना तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर ग्रुप ग्रामपंचायत जाटनांदूरसह शिरूर तालुक्यातील पूर परिस्थितीचे पाहणी व शेतकरी बांधवांचे शेतीचे पिकाचे कांद्याचे घरामध्ये पाणी शिरलेल्या घराचे विहीर पडलेले घर पाईपलाईन खरडून माती वाहून गेलेल्या शेतीचे फळबागाचे फळझाडे शेळ्या गाय म्हशी घरातील प्रपंच उपयोगी चमचा सकट धान्य उडीद या सर्व शेतकरी बांधवांचे पंचनामे करून त्यांना न्याय देण्याचे काम करावे हे आसे पळत पळत पंचनामे हे आम्हाला मान्य नाही जमिनीवरचा राजा - बळीराजा, त्याच्यां हक्कासाठी लढणारे उद्धवसाहेबच!

कृषिप्रधान महाराष्ट्रातच जर बळीराजा मदती अभावी तडफडत असेल, तर याची जबाबदारी कोण घेणार?

जनतेचा पोशिंदा उपाशी राहणार आणि सत्ताधारी गप्प बसणार हे आम्ही चालू देणार नाही!

ग्रुप ग्रामपंचायत जाटनांदूर परिसरामध्ये पहाणी केली त्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे शिरूर कासार तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांनी ठाम इशारा दिला - शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कुणीही डावललं, तर शिवसैनिक गप्प बसणार नाही!

*वाघोरा धरणे आंदोलनाची प्रशासनाने घेतली दखल*

# आंदोलनस्थळी आमदार, तहसील प्रशासन सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राऊत यांचा पुढाकार

माजलगाव (प्रतिनिधी):- ओला दुष्काळ जाहीर करा, कर्जमाफी करा या प्रमुख व इतर मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते अजयसिंह राऊत यांच्या पुढाकाराने वाघोरा ग्रामस्थांनी गावातच केलेल्या उपोषणाची दखल घेत आमदार प्रकाश सोळंके, तहसीलदार व महसूल प्रशासन आंदोलन स्थळी दाखल होत मागण्याबाबत सकारात्मकता दाखवून पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,अतिवृष्टीमुळे माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान झाले असून कापुस, सोयाबीन सह इतर खरिप पिके पुर्णत: पाण्याखाली गेले आहे . ढगफुटी, अतिवृष्टी पावसामुळे कि. आडगाव महसुल मंडळात गायगोठे, शेती अवजारे साहीत्य, गुराचा चारा, घराची पडझड होउन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन पुराच्या पाण्याने अक्षरशाः जमीनी खरडुन (वाहुन) गेल्या आहेत. शेतकरी वर्ग पुर्णत: उध्दवस्त झाला आहे. त्यामुळे दि.२६ सप्टेंबर पासून वाघोरा येथे ओला दुष्काळ व कर्ज माफी जाहीर करा, गावातील अतिवृष्टी पडझड झालेल्या घराची / गोठ्याची नुकसान भरपाई तात्काळ खात्यात वर्ग करा, वाघोरा येथे पोलीस प्रशासनाने वाढत्या चोरीचे प्रमाण बघता रोज रात्री गस्त घालुण चोराचा बंदोबस्त करावा, किट्टी आडगाव महसुल मंडळात कापुस पिकास हे. १ लाख रु व सोयबीन पिकास हे. ५० हजार रु आनुदान द्या, अतिवृष्टी मुळे खोळंबलेला विद्युत पुरवठा सुरळीत करा यासह विविध मागण्यांसाठी उपोषण करण्यात आले. यावेळी आमदार प्रकाश सोळंके, तहसीलदार संतोष रुईकर, कक्ष अधिकारी साळवे, कृषी सहाय्यक नलबले, पिक विमा अधिकारी प्रसाद सावंत, तलाठी काजी, ग्रामसेवक जी. एस. पुरमवार सह प्रशासन अधिकारी यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन निवेदन स्वीकारली व काही प्रमाणात अंमलबजावणी देखील केली. प्रकाश सोळंके यांनी आंदोलन स्थळी भेट देत गटविकास अधिकारी यांना फोन करून घरपडझडी व गोठ्यांचे तर सरसकट पंचनामे करा, ग्रामीण पोलीस स्टेशन कोळी यांना फोन करून वाढत्या चोरीचे प्रमाण बघता तातडीने गस्त घालण्यासाठी गाडी पाठवून चोराचा बंदोबस्त करा, तसेच सुर्डी सादोळा हॅम अंतर्गत मंजूर असलेल्या रस्ता काम तत्काळ सुरू करण्यासाठी संबंधित गुत्तेदारास पंधरा दिवसात चालू करण्याचे आमदारांनी गावकऱ्यासमोर आश्वासन दिले तर तहसीलदार संतोष रुईकर यांनी सदरील मागण्या शासनापर्यंत कळवू व वरील मागणी संदर्भात त्या त्या विभागात संबंधित कर्मचाऱ्यांना फोन करून मदत करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनात महिलाचा ही समावेश होता तर यावेळी सर्व गावकरी उपस्थित होते.

# पिकांचे पाहणी दौरे बंद करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा - राहुल जाधव



पाटोदा (प्रतिनिधी): बीड जिल्ह्यासह पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची पिके अक्षरशः नेस्तनाबूत झाली आहेत. गेल्या काही दिवसांपासून आमदार, खासदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पाहणी दौरे सुरू आहेत. मात्र, कोरड्या आश्वासनापलीकडे अद्याप शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही. यामुळे हे पाहणी दौरे थांबवून तालुक्यासह जिल्ह्यात तातडीने 'ओला दुष्काळ' जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे शासनाकडे केली आहे. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकवेळा ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. बहुतांश शेतकऱ्यांची पिके वाहून गेली असून शेती खरडून गेली आहे. उरलेली पिकेही पावसामुळे पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने पाहणी पंचनाम्यांमध्ये वेळ न घालवता शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राहुल शाहुराव जाधव यांनी प्रसिधद्वारे केली. तसेच मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ घोषित करून पिक विमा कंपन्यांना तातडीने विमा रक्कम वितरित करण्याचे निर्देश द्यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## ओढयामध्ये नाली करा व विद्युत पोलवरती एलईडी बल्ब बसवा - अशोक वीर

बीड प्रतिनिधी - बीड नगरपालिकेकडे एका निवेदनाद्वारे बहिरवाडी चे माजी सरपंच अशोक वीर यांनी प्रकाश आंबेडकर नगर मधील नागरी समस्यांचा विषय घेऊन मुख्याधिकारी यांची भेट घेतली. ९ पिण्याचे पाणी वेळेवर सोडणे प्रकाश आबेडकर नगर मधील सर्व नागरीक (वार्ड क्रमांक २५) प्रकाश आंबेडकर नगर मधील जुना ओड़ा आहे त्या ओठयामध्ये पावसाचे पाणी, लोकाचे घरातील साडपाणी, तसेच घरातील संडास पाणी ओडयामध्ये जमा होऊन आजू बाजुच्या लोकाना या पाण्याचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे जर जास्त पाऊस झाला तर आमच्या प्रकाश आबेडकर नगर भागातील घरामध्ये सदरील पावसाचे पाणी घुसून घरादारात पाण्याचे उफळे फुटत आहेत. आम्हाला येण्या-जाण्याकरीता रस्ता किंवा वाट सध्या नाही व सदरील भागामध्ये या पाण्यामुळे डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले असल्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. वरील मागण्या मार्गी लावाव्यात या मागणीचे निवेदन बहिरवाडी चे माजी सरपंच अशोक वीर, मनीषा वंजारे, कौशल्या पवार, जिजाबाई गायकवाड, सारिका वीर, वाघमारे या भागातील महिला, अजय वंजारे व युवक कार्यकर्ते उपस्थित होते.



# धारूर येथे नवरात्र उत्सवानिमित्त दुर्गामाता दौड

धारूर (प्रतिनिधी):- शहरामध्ये नवरात्र उत्सवानिमित्त दररोज दुर्गामाता दौड काढली जात आहे. या ही वर्षी मोठ्या प्रमाणात युवांचा उत्साह आणि देवीप्रति असलेली निष्ठा मात्र विशेष जाणवते. भगव्या पताकेखाली धावणारे हे युवक समाजातील एकता आणि श्रद्धेचे दर्शन घडवत.ही दौड संपन्न झाली किल्ले धारूर मागील अनेक वर्षांपासून दुर्गामाता दौड काढण्यामागील उद्देश म्हणजे मातृशक्तीप्रति भक्ती जागृत ठेवणे, राष्ट्रभक्ती दृढ करणे आणि समाजामध्ये शौर्य, पराक्रम व संघभावना वाढवणे हा आहे. या दौडीमुळे तरुणांमध्ये देशप्रेम व संस्कृतीप्रति जडणघडण होत असल्याचे दिसते.ही दुर्गामाता दौड रोज सकाळी सहा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, किल्ले धारूर येथून सुरू होऊन आंबा चोंडी माता मंदिर येथे जाते. दौडीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप आणि विविध देशभक्तांचे गाणे व पद्य स्वयंसेवक सामूहिक रित्या गात धावतात. सर्व स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने दौड पूर्ण केली.या दौडीत अनुभव शेंडगे, श्रीनिवास शिंदे, शंतनू मिसाळ यांच्यासह ध्रुव शुक्ला, सुरज गायके, अभय गायके, संजय मनेरी, श्लोक फावडे, विकी घोडके प्रमुख उपस्थितसह मोठ्या संख्येने स्वयंसेवक सहभागी झाले यावेळी ही दौड पाहण्यासाठी परिसरातील नागरिक सकाळी मोठ्या संख्येने जमलेले होते.



## बीड शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन नंबरचे धंदे बंद झाले पाहिजेत - रवी वडमारे

बीड (प्रतिनिधी) बीड शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर दोन नंबर चे धंदे सुरू असून हे धंदे तात्काळ बंद करण्यात यावे अशी मागणी रवी वडमारे यांनी केली आहे.



बीड शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनेक दिवसांपासून दोन नंबर चे धंदे सुरू आहेत. या दोन नंबर धंद्यावाल्याकडून हप्ता ठरून धंदे चालू आहेत. हे दोन नंबर चे धंदे खुलेआम चालू आहेत.हे धंदे बंद करण्यासाठी आतापर्यंत कोणीही पुढाकार घेतला नाही. कोणीही लक्ष दिले नाही. दोन नंबर चे धंदे करणारे हे पोलिसांच्या मदतीने हे धंदे चालवतात. असा आरोप रवी वडमारे यांनी केला आहे. एक सुजान नागरिक म्हणून त्यांनी याकडे लक्ष दिले असून हे धंदे बंद करण्याची मागणी केली आहे. दारू,गांजा, नशेच्या गोळ्या, नशेची औषधे, बॉटल, गुटखा,शिंदी, ताडी असे अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची मागणी केली असून हे धंदे तात्काळ बंद झाले नाही तर एस.पी ऑफिस समोर आंदोलन करणार असल्याची माहिती समाजसेवक रवी भैया वडमारे यांनी दिली आहे.

# नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी ५० हजार भरपाई दया- खेडकर

तलवाडा (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिदृष्टी मुळे खरीपात तील पिकाचे मोठे नुकसान झाले आहे दरम्यान रविवारी व सोमवार रात्री झालेल्याअतिदृष्टी मुळे शेतकऱ्यांचे खूप नुकसान झाले आहे तरी शासनाने वला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपयाची मदत द्यावी अशी मागणी युवा नेते आदिनाथ खेडकर यांनी केली आहे ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री राज्याचे अर्थमंत्री आहात त्या जिल्ह्यावर असा दुजाभाव का बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दादा तुमच्या पासून खूप मोठी अपेक्षा केली होती मग दादांनी बीड जिल्ह्यावर सावतार व्यवहार का मुसळधार पाऊस झाल्याने पिकाचे मोठे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळआर्थिक मदत ची गरज आहे शेतकऱ्यांना तात्काळ मदत



करावी अशी मागणी चकलांबा ग्रामपंचायत सदस्य आजिनाथ खेडकर यांनी केली अतिवृष्टी मुळे खरीप हंगामातील कांदा, सोयाबीन, मूग, अक्षरश नेस्तनाबूत झाले आहे. सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, तूर पीक पाण्याखाली गेले आहे काही शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे यासह फळबागांना देखील मोठ्या प्रमाणात हानी पोहोचले आहे रविवारी सोमवारी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने किती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांच्या पिकाचे सरसकट पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी व सरसकट व वला दुष्काळ जाहीर करा अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य आजिनाथ खेडकर यांनी केली आहे.

# ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे यांचा सत्कार संपन्न

नेकनूर (प्रतिनिधी) :- भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्णत्वाचा लढा म्हणजे मराठवाडा मुक्तीलढा सर्वत्र 'मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन' म्हणून साजरा केला जातो.

प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी गुरुवारी (दि.२५) सायं. ४.३० वा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड, पुणे येथे मुक्ती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते, यात नेकनूरच्या बंकटस्वामी मठाचे मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे यांना मराठवाडा भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे मा. अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या प्रमुख उपस्थितीत आपणास सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात विविध



क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मराठवाड्यातील भूमिपुत्रांना मराठवाडा भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. सांप्रदायिक क्षेत्रातील या वर्षीच्या मराठवाडा पुरस्कारासाठी श्रीगुरू बंकटस्वामी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नेकनूर करांच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.यावेळी ह.भ.प नाना महाराज कदम,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते,युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे,जि.प.सदस्य भारत काळे, नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे, ग्रा.पं.सदस्य चक्रधर शिंदे, हनुमान शिंदे, संजय शिंदे, रामभाऊ शिंदे,सखाराम शिंदे, कैलास शिंदे, प्रल्हाद शिंदे, गणपत गवळी यांच्यासह इतर मान्यवर व गावकरी उपस्थित होते.

# नगर-बीड हायवेवरील खड्डे बुजवून कारखेल युवकांचा सामाजिक आदर्श

दौलावडगाव (प्रतिनिधी):- नगर-बीड महामार्गावरील आष्टी तालुक्यातील कारखेल खुर्द परिसरात अनेक ठिकाणी महामार्गावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेवर धोका निर्माण झाला होता. या खड्ड्यांमुळे कधीही एखादा गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकरूण चालणार नाही. अशी परिस्थिती होती. हे लक्षात घेऊन कारखेल गावातील काही तरुणांनी एकत्र येत सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत श्रमदानातून खड्डे बुजवण्याचा उपक्रम राबविला.



या उपक्रमात अर्जुन बांगर, गोविंद घुले, सिद्धांत घुले, प्रकाश घुले, सागर घुले, करण राख, किशोर घुले आणि शिवजीत चौधरी या तरुणांनी पुढाकार घेतला. त्यांनी मिळून महामार्गावरील तब्बल दहा ते पंधरा खड्डे बुजवले. या कार्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला असून संभाव्य अपघात टळले. स्थानिक ग्रामस्थ व प्रवाशांनी या युवकांचे मनःपूर्वक कौतुक केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रशासनाकडे बोट दाखवण्याऐवजी या तरुणांनी स्वखर्चातून आणि श्रमदानातून समाजासाठी सकारात्मक उदाहरण निर्माण केले आहे. कारखेल गावातील युवकांचे हे कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरत असून, आपल्या हातून समाजाचे काहीतरी भले होऊ शकते हा संदेश त्यांनी कृतीतून दिला आहे.

# धारूर शहरात पावसामुळे पडझड झालेल्या घरांची तहसीलदार निळे यांच्याकडून पाहणी

धारूर (प्रतिनिधी):- दि.२६ शुक्रवार रोजी संध्याकाळी झालेल्या जोरदार पावसामुळे धारूर शहरातील अनेक नागरिकांच्या घराची पडझड झाली असून यामध्ये संसार उपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे याबाबत धारूर तहसीलचे तहसीलदार श्रीकांत यांना याबाबत समजतात त्यांनी प्रत्यक्ष घराची पडझड झालेल्या नागरिकांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला असून तलाठ्यांना पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.



शुक्रवारी संध्याकाळी नऊ वाजल्यापासून धारूर शहरात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडायल सुरुवात झाली होती हा पाऊस रात्रभर सुरूच होता पाऊस जोराचा असल्याने नागरिकांच्या घरामध्ये पाणी शिरल्याने आणि मातीचे घरे असलेल भितळामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचून उभी भीताड कोसळली आहेत यामुळे या घरांमध्ये असलेल्या संसार उपयोगी साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे यामध्ये संसार उपयोगी भांडी, धान्य, कपडे आधी वस्तू पूर्णपणे ताळ पडलेल्या ढिगार्याखाली गेली आहेत त्यामुळे काही नागरिकांचा संसार उघड्यावर आला आहे त्यामुळे नागरिकांवर स्थलांतर करण्याची वेळ येऊन ठेपली असून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे याबाबत धारूर तहसीलचे तहसीलदार श्रीकांत निळे यांना पत्रकार सुनील कावळे यांनी भ्रमणध्वनीद्वारे माहिती दिली होती माहिती मिळताच तहसीलदार यांनी दखल घेऊन संबंधित नागरिकांची भेट घेतली असून त्यांना धीर देण्याचे काम करीत पडझड झालेल्या घरांची पाहणी करून तलाठ्यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश तहसीलदार श्रीकांत निळे यांनी दिले आहेत यावेळी तलाठी श्री चौधरी , श्री राठोड व कर्मचारी रईस शेख हे उपस्थित होते.

# परळी तालुक्यातील तेलसमुख, बोरखेड, ममदापूर आदी गावांत धनंजय मुंडे यांनी केली नुकसानीची पाहणी



## शासनाकडे १००% नुकसान भरपाई साठी पाठपुरावा करणार – मुंडेंनी ठिकठिकाणी शेतकऱ्यांशी संवाद साधत दिला धीर

परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी):– परळी वैद्यनाथ तालुक्यातील तेलसमुख, बोरखेड, ममदापूर आदी गावांमधील अतिवृष्टी नुकसान व पुरपरिस्थीची माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी पाहणी केली. या दरम्यान तेलसमुख येथील एका शेतातील संपूर्ण कापसाच्या उभ्या पिकाचे पावसाने पूर्णपणे नुकसान झाले असून, संबंधित शेतकऱ्याच्या मुलीचे दिवाळीत लग्न प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी महिलेला धनु भाऊंच्या समोर अश्रू अनावर झाले.

शेतकरी महीलेने हाती आलेले संपूर्ण पीक नासले, लाखांवर नुकसान झाले भाऊ, आता लेकीचे लग्न कसे लावू? असा प्रश्न उपस्थित करताच धनंजय मुंडे यांनी शासन आपली मदत करेल अक्का, पण मुलीच्या लग्नाची काळजी करू नका, ठरलेल्या वेळीच लग्न होईल, त्याच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी मी घेतो, असा शब्द देत मोलाचा आधार दिला. रेखाबई तुकाराम कदम असे संबंधित शेतकरी महिलेचे नाव असून त्यांचे कापसाचे पूर्ण पीक पाण्याने नासून गेले आहे. परळी वैद्यनाथ तालुक्यात गोदावरी नदीला पूर आल्याने आजूबाजूच्या गावात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्याचबरोबर वाण नदिसह लहान मोठ्या सर्वच नद्यांना आलेल्या पुराने अनेक ठिकाणी शेतीतील माती खरडून गेली आहे, काही ठिकाणी नदीतील दगड गोटे शेतात वाहून आलेत तर अजूनही पिकांमध्ये गुडघाभर पाणी साचलेले आहे. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी तेलसमुख, ममदापूर, बोरखेड आदी गावांना भेटी देऊन स्थानिकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला, तसेच प्रशासनास १००% नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीने योग्य पंचनामे करण्याच्या सूचना केल्या. दरम्यान ममदापूर येथील ३८ वर्षीय तरुण शिवराज कदम हा पुराच्या पाण्यात दि. १६ सप्टेंबर रोजी रात्री पान २ वर...

# बीड जिल्ह्यात पावसाचा कहर गेवराई शहरात पावसाने घर कोसळले

## कुटुंबात पसरले चिंतेचे वातावरण,आवश्यक वस्तू ढिगार्याखाली



गेवराई (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात गेल्या पाच ते सहा दिवसापासून जोरदार पाऊस सुरू आहे पावसामुळे शेती पिकाचे अतोनात नुकसान झाले असून तसेच अनेक ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण झाली होती बीड जिल्ह्यातील गेवराई शहरात बोर्डे गल्ली येथील भुते यांचे घर पूर्णपणे कोसळले असून सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही या घरांमध्ये त्यांचे सर्व संसार उपयोगी साहित्य खाली दबुन गेले आहे. गेल्या आठ दिवसापासून सतत धार पाऊस कोसळत आहे भुते यांच्या घराच्या पूर्ण भिंतीमध्ये पाणी मुरले होते दिनांक २६ सप्टेंबर रोजी घराच्या भिंती कोसळल्या यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही.पावसामुळे घर कोसळण्याच्या घटना अनेक ठिकाणी घडल्या आहेत, विशेषतः जास्त पावसामुळे भिंती ओलसर होऊन कमकुवत झाल्यामुळे किंवा घरांची बांधणी जुनी व कमकुवत असल्यामुळे हे घडते. अशा घटनांमध्ये घरे कोसळण्याबरोबरच धान्य, कपडे आणि इतर घरगुती वस्तूंचे नुकसान होते आणि कुटुंब उघड्यावर आले आहे. गेल्या काही दिवसापासून दररोज पाऊस पडत आहे

मुसळधार पावसाने अनेक शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे नुकसान झाले आहे गेवराई तालुक्यात सिंदफणा गोदावरी व अमृता नदीला सर्वधिक पूर आल्याने अनेक लोकांचे पान २ वर...

# पूरामुळे संसार उद्धस्त झालेल्या नागरिकांसाठी चंपावती काकी कडून ५१ हजार ची मदत



शिरूर कासार (प्रतिनिधी):– रविवारी रात्री झालेल्या पावसाने सोमवारी सिंदफना नदीने धोक्याची पातळी ओलांडली व प्रचंड महापूर आला. या पुरामध्ये होत्याचं नव्हतं झालं. या पुरामध्ये काही घरच वाहून गेले तर बाजार पेठेतील दुकानातील असलेले फर्निचर सह इतरही साहित्य यापूरामुळे संसार उद्धस्त झालेल्या महाप्रलयात वाहून गेले त्यामुळे नागरिकांवर मोठे संकट कोसळले आहे. या पूरामुळे लोकांचे संसार उद्धस्त झाले असून त्या संकटाचा सामना करण्यासाठी शिरूर कासार शहरामध्ये पूरग्रस्तांना मदतीची हाक पान २ वर...

# यश ढाकाची निर्घृण हत्या सखोल चौकशी आणि खऱ्या गुन्हेगारांना अटक करा

## गुन्हेगारांना राजकीय पाठबळ दिले तर १८ पगड समाज रस्त्यावर उतरणार–आर्या सामाजिक प्रतिष्ठानचा तीव्र इशारा




बीड (प्रतिनिधी):– शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात घडलेली तरुण यश ढाका (पुत्र पत्रकार देवेंद्र सिंह ढाका) याची निर्घृण हत्या ही घटना संपूर्ण समाजाला हादरवणारी आहे. केवळ शुल्लक कारणावरून घडलेली ही अमानुष घटना कायदा–सुव्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित करते. या प्रकरणात गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोरात कठोर शिक्षा व्हावी, हीच समाजाची अपेक्षा आहे. आर्या सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करताना स्पष्ट इशारा दिला आहे की – ही केवळ एका कुटुंबाचे नुकसान नसून संपूर्ण दलित अठरापगड जाती धर्मातील समाजासाठी धोक्याची घंटा आहे. गुन्हेगारांना कठोर शिक्षा न झाल्यास आर्या सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र भूमिका घेतली जाईल. या दुःखद प्रसंगात आर्या सामाजिक प्रतिष्ठान व संपूर्ण समाज पत्रकार देवेंद्र सिंह ढाका यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. यशच्या अकाली मृत्यूमुळे उमलते स्वप्न चिरडले गेले असले तरी त्याची आठवण समाजात नवी ज्वाला पेटवत राहील.

स्व. यश ढाकाला भावपूर्ण श्रद्धांजली

बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात पत्रकार देवेंद्र सिंह ढाका यांचा होतकरू मुलगा यश ढाका याची निर्घृण हत्या ही केवळ एका कुटुंबाचे नुकसान नसून संपूर्ण समाज हादरवणारी पान २ वर...

# बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिप्ट बेकायदेशीर

## सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल वरपे यांनी घेतली राज्याचे मुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट,



बीड (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यातील गैर कानुनी व चुकीच्या पध्दतीने ३०० ते ४०० लिप्ट बसविण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये १५ ते २० ठेकेदार व बीड जिल्ह्यतील काही वरिष्ठ अधिकारी यांची पूर्णपणे चौकशी करून यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून ज्या विना परवान्याच्या लिप्ट बीड जिल्ह्यात चालू आहेत; त्या तात्काळ सिल करण्यात याव्यात व त्या ठेकेदारांचे लायसन्स रद्द करणे बाबत. स्वप्नील वरपे पाटील या सामाजिक कार्यकर्ते यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट घेतली आहे व रितसर निवेदन दिले आहे. उपरोक्त विषयी आपणास सविनय अर्ज करण्यात येतो की, बीड जिल्ह्यातील गैर कानुनी ३०० ते ४०० लिप्टचे चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये काही लिप्टला एमरजन्सी रिस्की डिव्हाईस बसविलेले नाहीत. रिस्की डिव्हाईसचे काम लाईट गेल्यानंतर लिप्ट एका फ्लोअरला सोडते. पान २ वर...


# रस्ते नाल्या नसल्याने गोरगरीब नागरिकांच्या घरात घाण पाणी शिरत असून तात्काळ सोय सुविधा करा




माजलगाव (प्रतिनिधी):– माजलगाव शहरातील महेबूब नगर मध्ये नगरपरिषद कार्यालय कडून सोय सुविधा देण्यात येत नाही तसेच याठिकाणी खाब्यावर सुद्धा लाइट नसल्याने अडचण निर्माण होत आहे तसेच रस्ते नाल्या नसल्याने चलता येत नाही. महेबुब नगर मध्ये भोकटदार पि टी आर देण्यात यावे. महेबुब नगर मध्ये रस्ते नाल्या वर मुरुम टाकण्यात यावे. महेबुब नगर मध्ये खाब्यावर लाईट बसविण्यात यावे. महेबुब नगर मध्ये नाल्या व रस्ते तात्काळ चौकशी करुन अंदाज पत्रक तयार करुन कामे करण्यात यावे. महेबुब नगर मध्ये पिण्याच्या पाण्याचा पाइप लाईन करण्यात आली होती परंतु रस्त्याच्या कामा मध्ये फुटली असून त्यामुळे आठ ते नऊ महिन्याच्या वर झाले तरी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली नाही तात्काळ पिण्याच्या पाण्याची पान २ वर...

# नगर रोड ते पालवन चौक धानोरा रोड रुंदीकरण व सिमेंट कॉंक्रेटचा होणार

## कौशल्य मस्के च्या मागणीला यश



बीड (प्रतिनिधी):– शहरातील नगर रोड पासून जाणारा धानोरा रोडची गेल्या पाच ते सात वर्षापासून अत्यंत दुरावस्था झाली आहे. या धानोरा रोड परिसरात जवळपास सुमारे वीस ते पंचवीस हजार लोक वस्ती आहे त्यामुळे शहरातील नगरपरिषद हद्दीतील एक प्रमुख रस्त्यामध्ये याची गणना केली जाते. तसेच या धानोरा रोड परिसरात चार मोठ्या शैक्षणिक संस्था देखील आहेत या शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे त्यामुळे या रस्त्यावर नेहमीच वर्दळ असते परंतु या रस्त्याची दुरावस्था झाल्याने विद्यार्थ्यांना देखील चालत जाणे कठीण झाले आहे पावसाळ्यात तर अक्षरशा

गुडघाभर पाण्यातून शाळेत जावे लागते. तसेच या रस्त्यालगत असणाऱ्या व्यापाऱ्यांना आर्थिक व धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. अशा अनेक पान २ वर...

# उद्या बीड येथे होणाऱ्या ओबीसींच्या महाएल्गार मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे –तालुकाध्यक्ष बोडखे

दौलावडगाव (प्रतिनिधी):– ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, कॅबिनेट मंत्री ना. छगन भुजबळ आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत आज रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचा भव्य महाएल्गार मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अ.भा.म.फुले समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी केले आहे. या मेळाव्यास राज्याचे कॅबिनेट मंत्री ना.छगन भुजबळ हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत.हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला आहे.यामुळे ओबीसी समाजामध्ये भीती आणि सरकार विरोधात असंतोष पसरला आहे.मराठा समाज बांधवांना स्वातंत्र आरक्षण देण्याला ओबीसी समाजाचा विरोध नाही तर पाठींबा आहे मात्र ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणारा निर्णय महाराष्ट्र शासन घेत असल्याने या निर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी समाज बांधवांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की काय ? या पान २ वर...



# समाज कार्यात डीजेला बंदी आन अवैध धंदेवाल्यांना पूर्ण संधी

परळी (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यासह महाराष्ट्र राज्यात डिजे बंदी केली आल्याने परळी तालुक्यातील गावातील दुर्गा उत्सवाच्या व गणेश उत्सव अण्णाभाऊ साठे जयंती स्वागत मिरवणुकीत डीजे वाजून बंदी घातली आहे यामुळे येथील असंख्य डीजे प्रमुखांचे घर उध्वस्त झाले आहेत याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी व डीजेला परवानगी देण्यात यावी यासाठी परळी तहसील कार्यालय समोर डीजे वाल्यांचे उपोषण सुरू आहे यासाठी लवकरात लवकर शासनाने निर्णय देण्यात यावा परवानगी नाही दिली तर आमरण उपोषण केले जाईल डीजे युनियन यांच्या वतीने असे सांगण्यात येते की आम्ही कोणत्याही कार्यक्रमाला स्पीकर मंडप लाईट फिटिंग कुठल्याही कार्यक्रमाला देणार नाहीत असा निर्णय आमच्या युनियन मध्ये ठरला आहे. जोपर्यंत डीजेला परवानगी भेटत नाही तोपर्यंत आम्ही कसल्याही प्रकारचे मंडप लॉर्ड स्पीकर हे चालू देणार नाहीत असा इशारा या संघटनेने केला आहे.




शासनाने अचानक पणे सरसकट ञा बंदी केली आहे. परंतु ही शासनाने सरसकट ञा बंदी केल्या मुळे अनेक कुटुंबा वर उपासमारीची वेळ आलेली आहे.ही बंदी उठवण्यात करिता आज परळी तहसिल कार्यालय समोर सर्व ञा वाल्यांनी उपोषण सुरू केले पान २ वर...

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT